# 'सोंगटी' नाटकाचा उद्या मोफत प्रयोग

पंख सामाजिक संस्था आणि क्विकहिल फाउंडेशनच्या शाळांगण प्रकल्पांतर्गत मुलींच्या शिक्षणावर आधारित 'सोंगटी' या नाटकाचा प्रयोग सादर केला जाणार आहे. मराठी अभिनेत्री माधवी सोमण व अंजली धारू हे नाटक सादर करणार आहेत. सावित्रीबाई फुले यांच्या जयंतीचे औचित्य साधून मुलींच्या शिक्षणावर आधारित 'सोंगटी' या नाटकाचा प्रयोग शुक्रवारी (६ जानेवारी) दुपारी ३ वाजता सादर होणार आहे. मंगळवार पेठेतील कै.बाबुराव सणस कन्याशाळेत हा प्रयोग सादर होईल. हा कार्यक्रम विनामूल्य आहे. खडतर आयुष्य वाट्याला येऊनही शिक्षण पूर्ण करून स्वतःच्या पायावर उभ्या राहणाऱ्या 'सोंगटी'ची गोष्ट या नाट्यकृतीत मांडण्यात आली आहे.